MHAH160008452016

## नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९७/२०१६ मधील निशाणी क्र.२९ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादींविरूध्द ताब्यासाठी, दरम्यानचे उत्पन्ना हिशोबासाठी आणि तदअनुषांगीक दादीकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्ज नि. २९ न्यायप्रविष्ठ करून विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. २ हे दिनांक ०२. ०३.२००९ रोजी मयत झाले असून त्यांच्यापश्चात त्यांच्या वारसांची नावे दाव्याकामी समाविष्ठ न केलेने दावा त्याच्याविरूध्द अबेट झाला आहे. सदर अबेटमेंट आदेश बाजूला सारावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध करत म्हणणे दिलेले आहे की, वादी यांनी जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र. २ यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेतली नाहीत. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करावा व मंजुर करावा असे मत झाल्यास जबर खर्चाची रक्कम आकारावी.

३. मुळ दावा पाहिला. अर्ज नि. २९ चे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. २ हे दिनांक ०२.०३.२०१९ रोजी मयत झाले आहेत ही बाब अभिलेखावरून दिसुन येत आहे. दाव्याचे दिवाणी स्वरूप पाहता प्रतिवादी क्र.२ यांचे पश्चात त्यांचे वारस प्रस्तुत दाव्याकामी आवश्यक पक्षकार ठरतात. वादींचे नि.२९ वरील अर्ज नामंजुर करावा असे कोणतेही संयुक्तीक कारण मजसमोर नाही. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याचे दिसुन येत आहे. परिणामी खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**नि.दि.दा.क.१९७/२०१६**
**निशाणी क.२९**

# आदेश

१. अर्ज नि. २९ मंजुर करण्यात येतो.

२. याद्वारे मयत प्रतिवादी क्र. ०२ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंट आदेश वादी यांनी खर्चाची रक्कम रूपये ३००/— भरण्याच्या अटीवर बाजूला सारण्यात येतो.

SHWETA ABHIJIT PARWATKAR
Digitally signed by SHWETA ABHIJIT PARWATKAR
Date: 2022.12.09 16:35:44 +0530

दिनांक : ०९.१२.२०२२
ठिकाण—अकोले.

( एस. अे.पर्वतकर )
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर
अकोले.